सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०—२५६२१२२८
२५६२१२२९
ई—मेल:pldvp@unipune.ac.in

गणेशखिंड, पुणे ४११००७
नियोजन व विकास विभाग

संदर्भ : साफुपुवि/निवि/ ४२८ दिनांक : २३/११/२०२६

१) मा. प्राचार्य/मा. संचालक
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था

२) मा. विभाग प्रमुख
विद्यापीठ शैक्षणिक विभाग,
प्रस्तुत विद्यापीठ

विषय : विद्यापीठाचा वार्षिक अहवाल २०२५—२६ साठी ऑनलाईन पध्दतीने माहिती सादर करण्यासाठी देण्यात आलेल्या मुदतवाढीबाबत (कालावधी — दि. १ जुलै, २०२५ ते दि. ३० जून, २०२६)

महोदय/महोदया,

आपणांस विदित आहेच की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १३६ मधील तरतूदीनुसार विद्यापीठाचा वार्षिक अहवाल महाराष्ट्र राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या पटलावर विहित कालावधीत सादर करणे बंधनकारक आहे. यास अनुसरून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांचे विद्या विषयक, संशोधन व विकास विषयक अन्य कार्यक्रम समाविष्ट असलेला वार्षिक अहवाल प्रतिवर्षी तयार केला जातो. सदर वार्षिक अहवालामध्ये समाविष्ट माहितीचा उपयोग शासन स्तरावर विविध धोरणात्मक निर्णयांसाठी केला जातो.

विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२५—२६ च्या वार्षिक अहवालासाठी ऑनलाईन पध्दतीने माहिती सादर करण्याची मुदत **दि. ०३ सप्टेंबर, २०२६ ते दि. १० ऑक्टोबर, २०२६** तसेच पुढील मुदतवाढ दि. २७ **ऑक्टोबर, २०२६** अशी निश्चित करण्यात आली होती.

या पत्रान्वये सदर मुदत **दिनांक २५ नोव्हेंबर, ते दिनांक ०२ डिसेंबर, २०२६** पर्यंत वाढविण्यात आलेली आहे. सदर वार्षिक अहवालासाठी आपल्या महाविद्यालयाची/परिसंस्थेची माहिती फक्त ऑनलाईन पध्दतीनेच सादर करण्यात यावी, **माहितीची छापील प्रत (Hard Copy) नियोजन व विकास विभागास सादर करण्याची आवश्यकता नाही.**

विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२५—२६ च्या वार्षिक अहवालासाठी ऑनलाईन पध्दतीने माहिती सादर करण्याची लिंक खालील प्रमाणे आहे.

www.unipune.ac.in – Home page - BOD Online – Login Page - Login with you Credentials – Dashboard -- Annual Report

आपणांस विनंती की, विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२५—२६ च्या वार्षिक अहवालासाठी माहिती विहित मुदतीत ऑनलाईन पध्दतीने सादर करून विद्यापीठास सहकार्य करावे. सदर माहितीची पूर्तता विहित मुदतीत न झाल्यास शासनाकडून व विद्यापीठाकडून विविध योजनेअंतर्गत मिळणारे अनुदान, सोयी/सवलती व इतर लाभ प्रलंबित राहण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तसेच या कालावधीनंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ दिली जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

23/11/26

(सतिश गडदरे)
सहायक कुलसचिव

प्रत — माहितीसाठी :
१. मा. प्र-कुलगुरू, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा. कुलसचिव, प्रस्तुत विद्यापीठ.